प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १९.०५.२०२१**

**सिडको एजन्सीमार्फत करणार द्रोणागिरी नोडमधील मुख्य रस्त्याचे बळकटीकरण/रिसरफेसिंग**

सिडको संचालक मंडळाने, खासगी एजन्सीमार्फत खोपटा पूल ते आयओटीएल, सेक्टर-०१, द्रोणागिरी दरम्यानच्या ७.२ कि.मी. लांब व ३६ मीटर रुंद मुख्य रस्त्याचे बळकटीकरण/रिसरफेसिंग करण्याचा निर्णय घेतला आहे.

**"सामान्य प्रवाशांचा प्रवास सुलभ होण्याबरोबरच जेएनपीटीकडे जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक सुरळीतपणे पार पडावी. या उद्देशाने सिडकोतर्फे द्रोणागिरी नोडमधील मुख्य रस्त्याचे बळकटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. द्रोणागिरी नोडमधील रहिवाशांकरिताही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सदर रस्ता हा द्रोणागिरी नोडमधील वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असल्याने या रस्त्याचे बळकटीकरण केल्यामुळे प्रवाशांना फायदा होण्याबरोबरच जेएनपीटीकडे जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या कंटेनरची वाहतूक सुरळीतपणे चालू राहण्यास मदत होणार आहे. या रस्त्याच्या बळकटीकरणामुळे द्रोणागिरी नोडमधील व जवळपासच्या गावांतील रहिवाशांचा प्रवासही सुलभ होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**